**प्रेसनोट दिनांक ०६/०७/२०१९**
**येरवडा पोलीस स्टेशन, पुणे**

**कम्युनिटी पोलीसींग, सहकार्यातून सुरक्षेकडे ( सीसीटीव्ही कॅमेरे वॉच ) या संकल्पने अंतर्गत येरवडा पो.स्टे.चे हद्दीतील आचार्य अत्रे स्कूल, येरवडा, पुणे येथे जावून तेथील शिक्षकांची बैठक घेवून त्यांना सुरक्षिततेे संदर्भात मागदर्शन केले बाबत.**

---

मा.पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांचे कम्युनिटी पोलीसींग व सहकार्यातून सुरक्षेकडे (सीसीटीव्ही कॅमेरे वॉच) या संकल्पने अंतर्गत श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पो.स्टे. यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पो.स्टे.कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी दि.०४/०७/२०१९ रोजी १२:४५ वा. ते १३:५० वा.चे दरम्यान येरवडा पो.स्टे.चे हद्दीतील आचार्य अत्रे स्कूल, येरवडा, पुणे येथे भेट देऊन, तेथील शिक्षक, व्यवस्थापक यांची भेट घेऊन त्यांना सहकार्यातुन सुरक्षेकडे (सीसीटीव्ही कॅमेरे वॉच प्रकल्प) या संकल्पनेची माहिती देऊन सीसीटीव्ही कॅमेरांचे महत्व पटवून दिले. तसेच त्यांना त्यांचे शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे सुरक्षेसाठी तसेच बाहेरील बाजूचा परिसर, रस्ते कव्हर होतील अशा रितीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत आवाहन करून त्यांना लेखी पत्र अदा केले.

तसेच वरील शाळांमधील शिक्षक व विद्यार्थ्यांची बैठक घेवून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या व त्यांना बालकांचे सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस स्टेशन कडून राबविण्यात येणारे पोलीस काका या उपक्रमाची माहिती दिली. तसेच बालकांचे संदर्भात घडणारे गुन्हे, बालगुन्हेगारी, व्यसनमुक्ती, सोशल मिडीयावरून घडणारे गुन्हे यांचेबाबत माहिती देऊन, अशा प्रकारचे गुन्हे घडू नयेत या करीता काय काय उपाययोजना केल्या पाहिजेत, काय दक्षता घेतली पाहिजे याची माहिती दिली. तसेच बालकांचे संरक्षणार्थ अंमलात असलेले कायदे, त्यामधील तरतुदी यांची माहिती देऊन मार्गदर्शन केले. तसेच पोलीस आयुक्त कार्यालयात बालके, महिला व जेष्ठ नागरिकांचे तक्रारींचे निराकरण करण्यासाठी नव्याने स्थापन केलेले भरोसा सेलची तसेच पोलीस आयुक्त कार्यालयाकडून नागरिकांसाठी राबविण्यात येणारे विविध १४ योजनांची माहिती दिली.

अशा प्रकारे श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस स्टेशन कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी कम्युनिटी पोलीसींग, सहकार्यातून सुरक्षेकडे व पोलीस काका या संकल्पनां अंतर्गत येरवडा पो.स्टे.चे हद्दीतील आचार्य अत्रे स्कूल, येरवडा, पुणे येथे भेट देऊन तेथील शिक्षक, व्यवस्थापन यांना सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत लेखी पत्र दिले तसेच शिक्षक व विद्यार्थी यांना बालकांचे संरक्षणाचे दृष्टीने मार्गदर्शन करून उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

